**जिल्हाधिकारी व जिल्हा दंडाधिकारी कार्यालय सिंधुदुर्ग**
मुख्य प्रशासकीय इमारत, पहिला मजला, ओरोस-सिंधुदुर्गनगरी,
ता.कुडाळ, जि.सिंधुदुर्ग, पिनकोड - 416 812 दुरध्वनी क्रमांक - 02362 - 229000,
**संकेतस्थळ - www.sindhudurg.gov.inईमेल- estsindhudurg@gmail.com**

क्रमांक साशा.कोरोना/ग्रा.स्त.स.आदेश/२०२० दिनांक - ०१/०५/२०२०

**वाचले -**

१. आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५
२. साथरोग प्रतिबंध कायदा १८९७
३. या कार्यालयाकडील दिनांक २९.०३.२०२० रोजीचा ओादश
४. महाराष्ट्र शासन महसूल व वन, आपत्ती व्यवस्थापन विभाग मंत्रालय मुंबई यांचेकडील आदेश क्र.DMU/2020/CR92/DisM-1 दिनांक ३०.०४.२०२०

## आदेश

ज्याअर्थी राज्य शासनाने करोना विषाणू (कोव्हिड - १९) प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथरोग प्रतिबंधात्मक कायदा १८९७ च्या खंड २,३, व ४ मधील तरतुदीनुसार दिनांक १४ मार्च २०२० रोजी अधिसूचना निर्गमीत केलेली आहे. तसेच आपत्ती व्यवस्थापन अधिनियम, २००५ मधील कलम २५ अन्वये जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाची स्थापना करण्यात आलेली आहे. व त्यातील पोटकलम २(अ) नुसार जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी हे उक्त प्राधिकरणाचे पदसिध्द अध्यक्ष आहेत.

ज्याअर्थी संदर्भ क्रमांक ३ अन्वये खालीलप्रमाणे गांव पातळीवरील यंत्रणेतून ग्रामस्तरीय नियंत्रण समिति गठीत करण्यात आलेली आहे.

| अ.क्र | नियुक्त केलेले पदाधिकारी/शासकीय कर्मचारी | समितीमधील स्थान |
|---|---|---|
| 1 | संबधित गावचे सरपंच | पदसिध्द अध्यक्ष |
| 2 | संबँधित गावचे तलाठी | सह अध्यक्ष |
| 3 | सचिव, विविध कार्यकारी सोसायटी | सदस्य |
| 4 | कृषी सहायक | सदस्य |
| 5 | आरोग्य सेवक | सदस्य |
| 6 | महिला बचत गट ग्राम संघ अध्यक्ष | सदस्य |
| 7 | सचिव, महिला बचत गट | सदस्य |
| 8 | पोलीस पाटील | सदस्य |
| 9 | सरपंच यांनी नियुक्त केलेले ग्रामपंचायत सदस्य | सदस्य |
| 10 | सरपंच यांनी नियुक्त केलेले ग्रामपंचायत सदस्य | सदस्य |

ज्याअर्थी उपरोक्त वाचले ४ अन्वये, लॉकडाऊन झालेमुळे मुळ गावापासून इतर ठिकाणी अडकलेल्या स्थलांतरीत कामगार, भाविक, पर्यटक, विद्यार्थी व इतर व्यक्ती यांना अटी व शर्तींच्या अधीन राहून व संबंधीत दोन्ही जिल्हा प्रशासनाच्या आदेशाने आपापल्या मुळगावी जाण्यासाठी परवानगी देण्यात येणार आहे. त्यानुसार सदर लोक हे मोठ्या प्रमाणावर सिंधुदुर्ग जिल्हयात येण्याची शक्यता आहे. त्यातील जे नागरिक ग्रीन व ऑरेंज झोन मधुन येणार आहेत अशा लोकांना २८ दिवस Home Quarantine करण्यात येणार असून, जे लोक मुंबई, पुणे व वेळोवेळी घोषित केल्या जाणा-या **Hotspot** क्षेत्रातून येणार आहेत अशा लोकांना कोरोना (कोव्हिड - १९) विषाणू प्रादुर्भाव रोखण्यासाठी गावपातळीवर १४ दिवस **संस्थात्मक विलगीकरण (Institutional quarantine)** व त्यानंतर पुढील १४ दिवस **गृह विलगीकरण (Home Quarantine)** करणे आवश्यक आहे.

त्याअर्थी मी, के.मंजुलक्ष्मी जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी सिंधुदुर्ग ग्रामपातळीवर **संस्थात्मक विलगीकरण (Institutional quarantine)** व्यवस्था पाहण्यासाठी ग्रामस्तरीय नियंत्रण समितीला खालील कामे करण्यासाठी प्राधिकृत करण्यात येत आहे.

१. ग्रामस्तरीय नियंत्रण समितीने गावपातळीवर संस्थात्मक विलगीकरण कक्ष (Institutional quarantine Center) करीता आवश्यक सोयी सुविधांची व्यवस्था होईल अशी इमारत (उदा.जिल्हा परिषद शाळा, अंगणवाडी व समितीस योग्य वाटेल अशी इतर इमारत इत्यादी) तयार करून ठेवावी.

२. बाहेरुन गावात वास्तव्यास आलेल्या व्यक्तींची नाक्यावर (Check Post) वैद्यकीय तपासणी झाली आहे याची खात्री करावी व नंतरच सदर व्यक्तींस घरी/संस्थात्मक विलगीकरण (Home/Institutional quarantine) केंद्रात पाठवावे. त्यांच्या सविस्तर तपशिलाची नोंद सदस्य सचिव यांनी ठेवायची आहे.

३. सदर समितीने ज्या लोकांना संस्थात्मक विलगीकरण (Institutional quarantine) केलेले आहे, अशा लोकांची राहाण्याची व इतर आवश्यक सोयी सुविधांची व्यवस्था करावी.

४. संस्थात्मक विलगीकरण (Institutional quarantine) करण्यात आलेल्या व्यक्तीची दैंनदिन वैद्यकीय तपासणी करण्याची जबाबदारी संबधित प्राथमिक आरोग्य केंद्रांची राहील. जर एखाद्या व्यक्तीला कारोना (कोव्हिड - १९) विषाणू संसर्गाची लक्षणे आढळून आल्यास सदर व्यक्तीची रवानगी तात्काळ CCC / DCH / DCHC येथे करावी.

५. संस्थात्मक विलगीकरण (Institutional quarantine) करण्यात आलेल्या व्यक्तीला कोरोना शिवाय अन्य तातडीच्या वैदयकिय उपचाराची गरज असल्यास तालुका आरोग्य अधिकारी (T.H.O.) यांचे संदर्भाने (Reference) त्यास तालुका स्तरावरील संस्थात्मक विलगीकरण (Institutional quarantine) केंद्र / CCC येथे संबंधित तहसिलदार यांनी दाखल करावे.

६. संस्थात्मक विलगीकरण (Institutional quarantine) व गृह विलगीकरण (Home quarantine) करण्यात आलेल्या व्यक्ती बाहेर फिरणार नाही तसेच इतर नागरिकांच्या संपर्कात येणार नाही याची संपूर्ण खबरदारी ग्रामस्तरीय नियंत्रण समितीने घ्यावयाची आहे. जर एखादी व्यक्ती आदेशाचे उल्लंघन करताना आढळल्यास त्याचेवर भारतीय दंड संहिता १८६० चे कलम १८८ नुसार कारवाई करावी.

७. सदर कामाकरीता श्री.हेमंत वसेकर, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद सिंधुदुर्ग यांची जिल्हास्तरावर नोडल अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात येत आहे. त्यांनी त्यांच्या अधिनस्त अधिकारी व कर्मचारी यांच्या आवश्यकतेनुसार नियुक्त्या कराव्यात. तसेच उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत) यांचे स्तरावर सदर कामाकरीता हेल्पलाईन सुरु करण्यात यावी. नोडल अधिकारी यांनी संस्थात्मक विलगीकरणाबाबत (Institutional quarantine) केलेल्या कार्याचा दैनंदिन अहवाल या कार्यालयास सादर करावा.

८. कोणतीही व्यक्ती / संस्था / संघटना / यांनी उक्त आदेशाचे उल्लंघन केल्यास भारतीय दंड संहिता (४५ ऑफ १८६०) च्या कलम १८८ नुसार दंडनिय / कायदेशीर कार्यवाहीस पात्र असतील व सदर कार्यवाही करणेकरीता ग्रामस्तरीय नियंत्रण समितीस प्राधिकृत करण्यात येत आहे.

(के.मंजूलक्ष्मी)
जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी
सिंधुदुर्ग

प्रत -

१. मुख्य कार्यकारी अधिकारी सिंधुदुर्ग
२. पोलीस अधिक्षक सिंधुदुर्ग
३. उपविभागीय अधिकारी सर्व
४. तहसिलदार सर्व
५. जिल्हा माहिती अधिकारी,सिंधुदुर्ग